**<u>प्रतिवादी क्र. ३ तर्फे उलटतपास श्री. जी. जे. पाटील वकील.</u>**

**१६**. मी सदरचा दावा प्रतिवादींनी अडथळा केल्यामुळे दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत माझी वडिलोपार्जित मिळकत आहे. गट क्र. १०७३ चे एकूण क्षेत्र ३ एकर असून त्याच्या पुर्वेला महादेव रामा गावडे, पश्चिमेला एकनाथ कृष्णा घोरपडे, दक्षिणेला दशरथ कृष्णा घोरपडे आणि उत्तरेला प्रकाश भिकू भादवणकर आहेत.

**१७**. मी दावा मिळकत खरेदी करण्यापूर्वी गट क्र. १०७३ चा सातबारा उतारा पाहिला होता. त्यामध्ये मालक सदरी एकनाथ कृष्णा घोरपडे, शेवंता कृष्णा घोरपडे व दशरथ कृष्णा घोरपडे यांची नावे होती. त्यापैकी एकनाथ घोरपडेच्या नावावरती ४ एकर आणि दशरथ व त्याच्या आईच्या नावे साडेतीन एकर असे वेगवेगळे क्षेत्र होते. मी सदर जमिनीचा आठ अ खाते उतारा पाहिला होता.

**१८**. माझ्या विरोधात या दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ व तिच्या मुलीने वाटणीचा दावा दाखल केला असून तो न्यायालयात प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दि. १०.०७.२००५ रोजी प्रतिवादी क्र. ३ सोबत लग्न केले असून ती माझी पत्नी म्हणून आरदाळ गावी राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिवादी क्र. ३ पासून शरयू, श्रेया आणि शुभ्रा अशा तीन मुली असून त्या दि. १९.११.२०१६ पर्यंत माझ्या सोबत राहत होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी दि. १९.११.२०१६ रोजी प्रतिवादी क्र. ३ व मुलींना हकलून दिले आहे.

**१९**. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र. ३ ने दाखल केलेल्या दाव्यामध्ये नि. क्र. १६ प्रमाणे दिलेल्या अर्जामध्ये त्यांच्या सोबत असलेले नातेसंबंध मान्य केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ३ च्या लग्नाची आरदाळ येथे नोंद झालेली आहे. प्रतिवादी क्र. ३ ने तिचे व मुलींचे दिनकर नावाने खोटे आधार ओळखपत्र बनवून घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र. ३ चा संजय रामू हडलगे सोबत विवाह झाल्याचे खोटे सांगत आहे. मी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे प्रतिवादी क्र. ३ च्या मुलींना पोटगीची रक्कम देत आहे.

**२०**. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीचा एकनाथ घोरपडे यांना कोणताही मोबदला दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र. ३ ला नेहमी घरातून हाकलून देण्याची धमकी देत असल्यामुळे एकनाथ घोरपडे यांच्यावरती बळजबरी करुन

विनामोबदला विक्रीपत्र करुन घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला एकनाथ घोरपडे यांनी दावा मिळकतीचा कधीही ताबा दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०३.१२.२०१७ रोजी मला कधीही प्रतिवादींनी अडथळा केलेला नाही. मी खरेदी केलेल्या मिळकतीत जमिनीतील इतर हिस्सेदारांच्या वाटण्या झालेल्या असल्यामुळे त्यांची संमती घेतली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींना त्रास देण्यासाठी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र. ३ व संजय हडलगे यांचा कायदेशीर घटस्फोट झालेला नसल्याचे खोटे सांगत आहे.

**२१**. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींनी ऊसाचे पिक घेतलेले असून सदर मिळकत बागायती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेला दावा प्रतिवादी क्र. १ ते ३ च्या विरोधात चालणेस पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जमीन मिळवण्यासाठी खोटा जबाब देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक - ०८.१०.२०२४.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.